महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन ज्ञापन क्रमांक : पोप्रमा-०७१७/प्र.क्र.३७४/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक : २८ मे, २०१८.

विषय :- पोलीस मुख्यालय, जळगांव, यांच्या आवारातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ रस्त्यांचे-कॉंक्रिटीकरण-जळगांव/ संकीर्ण/ ४१/ २०१५, दिनांक १६.०६.२०१७.
४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ रस्त्यांचे-कॉंक्रिटीकरण-जळगांव/ संकीर्ण/ ४१/ २०१५, दिनांक १५.१२.२०१७.

ज्ञापन.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी पोलीस मुख्यालय, जळगांव, यांच्या आवारातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त कामासाठी सहायक अभियंता, श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, क्र.१, जळगांव, यांनी सन २०१७-१८ च्या दरसूचीनुसार तयार केलेले रु.४९९.९५ लक्ष इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले आहेत. हे खर्चाचे अंदाज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव, आणि अपर पोलीस अधीक्षक, जळगांव, यांनी सांक्षाकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते **रु.४,८७,८९,९९०/-** असे सुधारित केले आहेत आणि, विवक्षित अटींवर, प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस मुख्यालय, जळगांव, यांच्या आवारातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी **रु.४,८७,८९,९९०/-** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) उक्त खर्चाचे अंदाज हे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, जळगांव, आणि मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, नाशिक, यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे;
२) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरु करु नये.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००)(०१) जिल्हा पोलीस बल (अनिवार्य) *(दत्तमत)* (२०५५ ०१६८), २७, लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५७१/इमा-२, दिनांक १४.०३.२०१८, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८०५२८१४४१२२२६२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.05.28 14:41:17 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक.
३) पोलीस अधीक्षक, जळगांव.

प्रत:-

१) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, नाशिक *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारित केलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, जळगांव *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारित केलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारित केलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
४) जिल्हा कोषागार अधिकारी, जळगांव.
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
६) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग मंत्रालय, मुंबई.
८) निवड फाईल (पोल-७).